महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत
(दुसरा व चौथामजला) सर्व्हे नं. ८३२ ए,भांबुर्डा, शिवाजीनगर,पुणे ४११००४
दूरध्वनी क्र.:-020-29709617 वेबसाइड:-mscepune.in ई-मेल :-www.mscegcctbc@gmail.com

जा.क्र. मरापप/जीसीसी/संटां/प्रशा/जून-२०२५/ 2900
दिनांक :- 10 /०६/२०२५

# प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांचे मार्फत इंग्रजी ३० व ४० श.प्र.मि ची शासकीय संगणक टायपिंग प्रमाणपत्र परीक्षा (GCC-TBC) दि. १८ जून २०२५ ते २४ जून २०२५ या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने राज्यभरातील एकूण २२२ परीक्षा केंद्रांवर घेण्यात येणार आहे. इंग्रजी टायपिंग परीक्षेतील विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र परीक्षा परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळावर संस्था लॉगीनव्दारे **दि. १०/०६/२०२५** रोजी प्रसिध्द करण्यात येत आहेत.

संबंधित संगणक टायपिंग संस्थाचालकांनी त्यांच्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन त्यावर विद्यार्थ्यांचा अद्ययावत फोटो चिकटवून या फोटोवर संस्थेचा शिक्का व स्वाक्षरीसह संबंधित परीक्षार्थ्यांना त्वरीत प्रवेशपत्र वितरीत करावेत.

प्रवेशपत्रातील दुरुस्तीकरीता यापूर्वीच संधी देण्यात आलेली असल्यामुळे विद्यार्थ्याचे नाव, आडनाव, वडिलांचे नांव/ पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल इ. कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदर परीक्षेत प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ परीक्षा, स्पर्धा परीक्षा, ITI परीक्षा इ. परीक्षा असल्यास बॅच बदलण्यासाठी सर्व संस्थाचालकांना त्यांचे लॉगीनमध्ये लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. **सदर लिंक दि. ११/०६/२०२५ ते दि.१२/०६/२०२५ या कालावधीत सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत सुरु राहील.** बॅच बदलासाठी या लिंकचा वापर अनिवार्यपणे करावा. इतर कोणत्याही माध्यमाव्दारे (ई-मेल, व्हॉटस् अॅप, टपालाने) बॅच बदलासाठीचे विनंती अर्ज स्विकारले जाणार नाहीत. याची सर्व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. बॅच बदलासाठी लॉगीनमध्ये नोंद करताना इतर परीक्षांचे (विद्यापीठ, स्पर्धा परीक्षा ITI परीक्षा) प्रवेशपत्र तसेच संगणक टायपिंग परीक्षेचे प्रवेशपत्र केवळ Uploadकरायचे आहे. यांनतर कोणत्या दिवशी परीक्षेला बसायचे आहे याबाबतचे २-३ प्राधान्यक्रम (तारखा) द्यावयाचे आहेत. लॉगीनव्दारे प्राप्त अर्जावर दिनांक १५/०६/२०२५ सायं. ६:०० वाजेपर्यंत निर्णय घेण्यात येईल व तसे संस्थाचालकांना लॉगीनव्दारे अवगत करण्यात येईल. एकदा बॅच बदल दिल्यानंतर संबंधित विद्यार्थ्याला सुधारीत बॅचमध्येच परीक्षा देता येईल.

विदयार्थ्यांनी ३० मिनिटे आधी परीक्षा केंद्रावर हजर राहावे. सुरुवातीला विदयार्थ्याचे ओळखपत्र तपासणे, चढत्या क्रमाने विदयार्थ्यांना बसविणे व हजेरी पटावर स्वाक्षरी घेणे इत्यादी कामे करण्यात येतील. त्यानंतर विदयार्थ्यांनी ३ मिनिटांचा सराव उतारा (Trail passage) सोडवावयाचा आहे. या Trail passage ला कोणत्याही प्रकारचे गुण देण्यात येणार नाहीत. परीक्षा सुरु होण्यापुर्वी ४ मिनिट आधी Trail passage ची लिंक बंद करण्यात येईल. म्हणजेच विदयार्थ्याला बॅचच्या वेळेच्या आधी सकाळी ८.३० ते ८.५६, १०.३५ ते १०.५६, दुपारी १२.४५ ते १.११, २.५० ते ३.११ आणि ४.५० ते ५.११ या वेळेतच सराव उताऱ्याचे (Practice passage) टायपिंग करता येईल.

पहिल्या सत्रामध्ये बरोबर ९ AM वाजता दुसऱ्या सत्रामध्ये ११ AM वाजता तिसऱ्या सत्रामध्ये १.१५ PM वाजता व चौथ्या सत्रामध्ये ३.१५ PM वाजता परीक्षेला सुरुवात होईल. जर विदयार्थी उशीरा आला तर तेवढा वेळ त्याचे वस्तूनिष्ठ प्रश्नांच्या वेळेमधून कमी करण्यात येईल. उदा. सकाळी ९.००AM वाजता परीक्षेला सुरुवात झाली व विदयार्थी ९.०५ AM वाजता हजर झाला तर त्याच्या एकूण वस्तूनिष्ठ प्रश्नांसाठी देय असलेल्या २५ मिनिटांमधून ५ मिनिटांचा वेळ आपोआपच कमी करण्यात येईल व पर्यायाने त्याला वस्तूनिष्ठ प्रश्न सोडवण्यासाठी केवळ २० मिनिटे मिळतील. परीक्षा सुरु झाल्यापासून ५ मिनिटांनंतर कोणालाही परीक्षा केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येणार नाही. याची नोंद सर्व संस्थाचालकांनी व विदयार्थ्यांनी घ्यावयाची आहे.

परीक्षेला सुरुवातीलाच ५ मिनिटे अनिवार्य असलेला ई-मेल विभाग, त्यानंतर गतीउतारा (speed passage) तक्ता, पत्र व शेवटी वस्तूनिष्ठ (objective) प्रश्नांचा विभाग असे क्रमाक्रमाने संगणकावर सोडवयाचे आहे. गती उतारा (speed passage) सुरु होण्यापुर्वी ३० सेकंदांचा काऊंटडाऊन टायमर स्क्रीनवर दिसेल. या ३० सेकंदांच्या कालावधीत गती उतारा टाईप करता येणार नाही. ३० सेकंद पुर्ण झाल्यानंतर speed passage चा ७ मिनिटांचा टायमर सुरु होईल व ७ मिनिटांमध्ये विदयार्थ्यांनी आपला गती उतारा पुर्ण करावयाचा आहे.

संगणक टायपिंग परीक्षेमध्ये परीक्षा केंद्रावर डमी उमेदवार आढळून आल्यास त्याचेवर तात्काळ गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

परीक्षा झाल्यानंतर विदयार्थ्यांनी आपआपले प्रवेशपत्र केंद्र संचालकांकडे जमा करावयाचे आहेत. जर एका विदयार्थ्याने ३०,४० श.प्र.मि. टायपिंग परीक्षेचा अर्ज केलेला असेल तर त्याला दोन्ही विषय मिळून एकच प्रवेशपत्र देण्यात येणार आहे. अशा प्रसंगी दुसऱ्या वेगाची (speed) परीक्षा झाल्यानंतरच प्रवेशपत्र विदयार्थ्यांनी परीक्षा केंद्रवर जमा करायचे आहे.

**(अनुराधा ओक)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०४**